# ज्ञान प्रबोधिनी


॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

ज्ञान प्रबोधिनी
शैक्षणिक साधन केंद्र


## ई - प्रशिक्षक

वर्ष २ : अंक ११ / ऑगस्ट २०१५





कै. आप्पा पेंडसे



गातुविद्— द पाथफाइंडर



अध्यापकाच्या नोंद वहीतून





## केलेले प्रयत्न,त्यात मिळालेले यश-अपयश हाही शिक्षणाचा भाग !

केवळ लेखी परीक्षांमधून मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत पुरेशी माहिती मिळत नाही. त्यासाठी मूल शाळेमध्ये औपचारिक आणि अनौपचारिक असे दोन्ही प्रकारचे अनुभव घेत असताना त्याचे निरीक्षण करणे गरजेचे असते. हे निरीक्षण बऱ्याचदा गुणात्मक (Qualitative ) असते. असे निरीक्षण वर्णनात्मक पद्धतीने लिहिले जाते. पूर्व प्राथमिक स्तरावर असे निरीक्षण इंद्रिय विकास, भाषिक विकास, सामाजिक सवयी, इ. शीर्षकांखाली नोंदवण्याची पद्धत आहे. या अंकामध्ये ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिरातील शिशु वर्गाच्या एका अध्यापिकेने लिहिलेले वृत्त दिले आहे. हे वृत्त तपशीलवार आहे. आवश्यक तेथे निरीक्षण केलेले प्रसंग व अन्य तपशील दिले आहेत. सामन्यत: २० मुलांच्या वर्गात असे निरीक्षण करणे शिक्षिकेला शक्य होते. स्वत:च्या वहीत कच्च्या नोंदी करत नंतर त्यांचा सारांश सत्रातून एकदा-दोनदा पालकांपर्यंत पोहोचवला जातो.

मूल जसजसे मोठे होऊन प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर पोहोचते तसे त्याला शाळेतून मिळणाऱ्या प्रगतीपुस्तकाचा प्रकार बदलत जातो. गुणात्मक नोंदींपेक्षा संख्यात्मक नोंदींना म्हणजेच मार्कांना महत्त्व प्राप्त होते. हे मार्क किंवा श्रेणी यातून कोणता बोध घ्यायचा हे न कळल्याने मुलाला सुधारणा किंवा बदल करण्यासाठी काय करावे ते समजत नाही. खरे तर आकारिक - मूल शिकत असताना त्याचे निरीक्षण करणे फारच महत्त्वाचे असते. लहानपणी मूल शिकताना बऱ्याचदा त्याचे आई-वडील, आजी-आजोबा किंवा घरातील इतर सदस्य निरीक्षण करत असतात. ते आई म्हणायला कधी शिकले, रांगायला कधी लागले, धरून चालायला कधी शिकले, स्वत:चे स्वत: जेवायला कधी लागले हे सारे आईने पाहिलेले असते आणि त्याचे तिला आणि साऱ्या कुटुंबाला कौतुक असते. मुलाची शारीरिक आणि मानसिक वाढ कशी होते हे आईला अशा निरीक्षणातून कळत असते. माझे मूल उशिरा बोलायला लागले याची तिला काळजी असते. मुलाच्या बाबतीत कोणत्या गोष्टी लवकर किंवा उशिरा होतात हे तिला अनुभवातून कळायला लागते. त्यासाठी आईचे औपचारिक प्रशिक्षण झालेले नसते. परिसरातल्या अनुभवी आयांकडून ती प्रशिक्षित होत जाते. अलीकडे अनेकदा मुलांची प्रकाशचित्रे काढली आहे / काढली जातात. एका कुटुंबात मी पाहिलेकी पहिली ३ वर्षे मासिक वाढदिवशी आणि नंतर दरवर्षी मुलीचे प्रकाशचित्र काढण्याची पद्धत होती. या सर्व प्रकाशचित्रांचा आल्बम एकत्र पाहताना मुलीच्या शारीरिक वाढीची छान कल्पना यायची.

मूल शाळेत आल्यानंतर ते अनेक प्रकारची कौशल्ये शिकत असते. त्यात शारीरिक, भाषिक, गणिती, बौद्धिक, वर्तन अशा अनेक क्षेत्रांतील कौशल्यांचा समावेश असतो. आपल्या ज्ञानेंद्रियांद्वारे माहिती मिळवणे, ती माहिती समजून घेणे, तिचे उपयोजन करणे ह्याचाही समावेश शिक्षणात होत असतो. मुलाच्या व्यक्तिमत्त्वात होणारे बदल, त्या बदलाची दिशा, बदल होण्यासाठी त्याचा फीडबॅक हा मूल्यमापनातून मिळावा अशी अपेक्षा असते. त्यासाठी देखील शिक्षकांनी मुलांच्या वर्तनाचे निरीक्षण करावे, वर्गकार्य व गृहकार्य तपासावे, मुलांना विविध प्रकारचे प्रकल्प द्यावेत, त्यांच्याकडून कृतिउपक्रम करून घ्यावे असे सांगितले जाते. वेळोवेळी विशेष प्रसंगनोंदी (anecdotal records ) ठेवल्यास त्या आधारे मुलाच्या विकासाबाबत नेमके भाष्य करता येणे शक्य आहे. अशा नोंदींच्या आधारे मुलांना मार्गदर्शन करता येते. गोवर्धन गुरुकुलातील अध्यापिकांनी लिहिलेल्या नोंदींवरून नववीतील एका विद्यार्थिनीचे व्यक्तिमत्त्व वाचकांच्या लक्षात येईल.

एखाद्या विद्यार्थ्याच्या अनेक वर्षे सातत्याने केलेल्या नोंदींच्या आधारे त्याच्या व्यक्तिमत्त्वातील बलस्थाने व मर्मस्थाने शिक्षकाला सांगता येतात. मी स्वत: गेली १०-१२ वर्षे माझ्या अनेक विद्यार्थ्यांना शिफारस पत्रे देत असतो. बऱ्याच वेळा उच्च शिक्षणासाठी अशी शिफारसपत्रे लागतात. सामान्यत: अशी पत्रे औपचारिक पद्धतीने लिहिली जातात. मी दिलेली ९०% हून अधिक शिफारसपत्रे युरोप—अमेरिकेतील विद्यापीठांतील प्रवेशासाठी दिली आहेत. ही विद्यापीठे शिफारस देणाऱ्यांकडून खूप अपेक्षा बाळगतात. मला शिफारसपत्रे लिहिताना मुलांच्या सहा वर्षांच्या कालावधीत केलेल्या निरीक्षणांचा खूप उपयोग झाला. अशा शिफारसींबरोबरच विद्यार्थ्यांचे त्याच्या गटातील स्थान ( उदा. Top 10%, Top 20%. इ. ) अध्यापकाच्या कारकिर्दीत शिकवलेल्या एकूण विद्यार्थी संख्येतील स्थान, इ. बाबी लिहायच्या असतात. विद्यार्थ्यांची केवळ सकारात्मकच निरीक्षणे नोंदवायची नसतात तर त्याच्या व्यक्तिमत्त्वातील नकारात्मक बाबी किंवा मर्यादा यांचीही नोंद प्रामाणिकपणे करायची असते. याच अंकात मी एका विद्यार्थिनीसाठी लिहिलेले शिफारसपत्र दिले आहे. या लेखात तिच्या अभ्यासातील यशाशिवाय तिची सामाजिक जाणीव, गटात काम करण्याची पद्धत, संवाद कौशल्य याबाबतचे अभिप्रायही लिहिले आहेत.

अध्यापकांनी केलेली निरीक्षणे अधिकाधिक वस्तुनिष्ठपणे नोंदविणे गरजेचे असते. एखाददुसऱ्या प्रसंगातून लक्षात आलेल्या गोष्टी नोंदवताना विशेष काळजी घेतली पाहिजे.अध्यापकाने केलेल्या सातत्यपूर्ण निरीक्षणांच्या आधारे लिहिलेला ‘ आम्ही सावित्रीच्या लेकी’ हा लेख या अंकात प्रकाशित केला आहे. ऊस तोडणी मजुराच्या शाळेची नावड असणाऱ्या मुलीची ही कहाणी आहे. मुलीच्या व्यक्तिमत्त्वात, प्रेरणेत आणि वृत्तीत झालेले बदल लेखकाने टिपले आहेत. अनेक वर्षे केलेल्या निरीक्षणांतून असे लेखन घडत जाते.अशा लेखनाचा उपयोग केवळ विद्यार्थी, पालक यांनाच होत नाही तर शाळेला अथवा शासकीय संस्थांना धोरण निश्चित करण्यासाठी होत असतो. कोणते शैक्षणिक अनुभव मुलांना आवडतात, कोणते परिणामकारक ठरतात, अनुभवांना मुले प्रतिसाद कशी देतात यासारख्या नोंदींमुळे शैक्षणिक प्रक्रिया अधिकाधिक समृद्ध होत जाते.

बऱ्याचदा विद्यार्थीसंख्या ही शिक्षकांना अडचण वाटत असते. संख्या कमी करणे शक्य नाही. परंतु निरीक्षण नोंदी ठेवण्याची पद्धत बसवता येईल का ? त्यासाठी आवश्यक सारण्या—तक्ते तयार करणे, निरीक्षणाचे वेळापत्रक तयार करणे, दररोज शाळा सुटल्यावर फक्त १० मिनिटे दिवसभरातील महत्त्वाच्या घटनांच्या ( विद्यार्थ्यांच्या संदर्भात ) नोंदी डायरीत करणे, प्रत्येक विद्यार्थ्याचे वहीत एखादे पान, संगणकावर एखादे फोल्डर करून ठेवणे, शक्य असेल तेव्हा मुलांनी तयार केलेल्या वस्तू, त्यांचे लेखन, त्यांची चित्रे यांचे फोटो, ऑडिओ किंवा व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ठेवणे, इत्यादी अनेक उपाय करता येतील. १०० टक्के मुलांच्या शंभर टक्के नोंदी करता येणे शक्य नाही परंतु १० ते १५% मुलांच्या तपशीलवार नोंदी व उरलेल्यांच्या काही बाबतीतल्या नोंदी केल्या तरी आपल्याला हळूहळू हे तंत्र जमायला लागेल. आपणही अशा नोंदींच्या आधारे आपल्या विद्यार्थ्यांबद्दल निरीक्षण लेख लिहू शकाल. त्यातून आपण सातत्वपूर्ण सर्वकष मूल्यमापनाच्या दिशेने एक पाऊल पुढे जाऊ.

प्रा. विवेक पोंक्षे
संपादक
ई- प्रशिक्षक

| संपादक | कार्यकारी संपादक | मांडणी | मुद्रित शोधन |
|---|---|---|---|
| विवेक पोंक्षे | प्रशांत दिवेकर | स्मिता साठे | भाग्यश्री हर्षे |

ई प्रशिक्षक हे प्रयोगशिल शिक्षकांसाठीचे ई व्यासपीठ आहे. ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेमार्फत हा अंक शिक्षकांपर्यंत मोफत वितरीत केला जातो.

## कै. आप्पा पेंडसे जन्मशताब्दी वर्ष

राष्ट्रीय चारित्र्यनिर्मितीसाठी मनुष्य घडण आणि मनुष्यघडणीसाठी शिक्षण या सूत्रामध्ये देशप्रश्नांवर काम करणारी संघटना म्हणून कै.आप्पांनी ज्ञान प्रबोधिनीची स्थापना केली. आज शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य आणि संघटन अशा दिशांनी राष्ट्रघडणीसाठी मनुष्य घडणीचे प्रयोग ज्ञान प्रबोधिनीत उभे राहात आहेत.

कै. आप्पा पेंडसे जन्मशताब्दी वर्षात प्रशिक्षकच्या अंकांमधून त्यांचा शैक्षणिक विचार आणि राष्ट्रघडणीची भूमिका मांडणारे चिंतन क्रमशः प्रसिद्ध केले जाईल. कै. आप्पांच्या निधनानंतर श्री.वि.वि. चिपळूणकरांनी आप्पांचे शैक्षणिक चिंतन आणि ज्ञान प्रबोधिनीचे शैक्षणिक प्रयोग याबद्दल लिहिलेला लेख या अंकात पुनर्मुद्रित करत आहोत.

कैलासवासी आप्पांच्या आणि माझ्या तीन-चार भेटी झालेल्या आहेत. ज्ञान प्रबोधिनीतही मी अनेकदा आलेलो आहे आप्पा असताना आणि आप्पा गेल्यानंतरही.

आप्पांच्या दोन आठवणी अगदी ठळकपणे माझ्या मनात आहेत. शिक्षण संचालक म्हणून माझी नेमणूक झाल्याचा पहिलाच दिवस होता. आप्पा माझ्या कार्यालयात मला भेटायला आले होते. सोनचाफ्याची टपोरी ओंजळभर फुलं त्यांनी मला दिली. माझं अभिनंदन केलं. मला शुभेच्छा दिल्या आणि म्हणाले, “ आज फक्त एवढ्याचसाठी आलो होतो. बाकी काम काहीही नव्हतं.”

दुसरी आठवण अगदी अलीकडची आहे—आप्पांच्या शेवटच्या दिवसांतली. आमदार श्री. व. छो. चव्हाण हे आजारी होते आणि त्यांना घोले रस्त्यावरील जोशी रुग्णालयात ठेवलेलं होतं. त्यांना भेटण्यासाठी माननीय शिक्षणमंत्री ना. सुधाकरजी नाईक यांच्यासह मी गेलो होतो. तेव्हा कळलं की शेजारच्याच खोलीत आप्पांना ठेवलेलं आहे. म्हणून अर्थातच आम्ही दोघेही आप्पांच्या खोलीत गेलो. आप्पांची प्रकृती खूप बिघडलेली दिसत होती. आमची प्रकृतीची चौकशी करून व्हायच्या आधीच आप्पा बोलू लागले. त्यांच्या मनात त्यावेळी कृषि-औद्योगिक तंत्रनिकेतनाची (ॲग्रिकल्चरल पॉलिटेक्निक) कल्पना घोळत होती. ती त्यांनी आम्हाला विस्तारानं सांगितली. “ ग्रामीण मुलांना इंग्रजी-गणित आलंच पाहिजे असा आग्रह धरणं कुणाच्याच हिताचं नाही. त्यांना खरोखरच उपयुक्त ठरू शकेल असं शिक्षण कृषि-औद्योगिक तंत्रनिकेतनातून देता येईल. आम्ही खेड-शिवापूरला असा प्रयोग सुरू केला आहे. तो तुम्ही एकदा जाऊन अवश्य पाहा.” असे ते अगदी कळकळीने सांगत होते. रुग्णशय्येवरसुद्धा आप्पांच्या मनात शैक्षणिक चिंतनच चालू होतं.

शिक्षकानं ‘गातुविद्’ झालं पाहिजे असा वेदातला आदर्श विनोबा नेहमी सांगत. गातुविद् म्हणजे नवीन रस्ते शोधणारा. हे वर्णन आप्पांना नेमकं लागू होतं असं मला वाटतं. शिक्षणक्षेत्रात पडायचं ठरवल्यानंतर सगळ्या मळलेल्या वाटा त्यांनी नाकारल्या आणि ज्ञान प्रबोधिनीची नवीनच वाट शोधिली.

त्यांचे शैक्षणिक विचार नि:संदिग्ध होते. समाज कुठं आहे, आपल्याला कोणत्या ध्येयाप्रत जायचं आहे, याविषयीच्या त्यांच्या कल्पना सुस्पष्ट होत्या. त्यामुळे ते कधीच चाचपडले नाहीत. पुष्कळ लोक काही अशैक्षणिक उद्दिष्टं डोळ्यांसमोर ठेवून शिक्षणसंस्था काढतात. त्यातून समाजाची दिशाभूल होते आणि कधी कधी तर विघातक प्रवृत्ती निर्माण होतात. पण आप्पांचा शैक्षणिक ध्येयवाद आणि राष्ट्रभक्ती विशुद्ध होती. त्यांच्या कल्पनांमध्ये कुठेही विसंगती नव्हती. विचारपूर्वक ठरवलेल्या ध्येयावर त्यांची निष्ठा होती. त्यामुळे कधीही धरसोड किंवा तडजोड न करण्याचा कणखरपणा त्यांनी दाखवला.

**हाडाचे संशोधक**

आप्पा उत्तम शिक्षक होते, संघटक होते, विचारवंत होते, प्रशासक होते, पण मूलतः ते संशोधक होते. संशोधनाच्या आधारानेच त्यांनी प्रबोधिनीसारखी विशेष प्रकारची संस्था उभी केली. बुद्धिमान विद्यार्थी निवडून त्यांच्यामधून देशप्रेमानं भारलेली आणि विविध क्षेत्रांत नेतृत्व करणारी युवाशक्ती निर्माण करायची असा त्यांचा अभिनव प्रयोग होता. स्वामी विवेकानंदांना ते गुरू मानत. भारतीय तत्त्वज्ञान आणि पाश्चिमात्यांचं विज्ञान यांचा संयोग केला गेला पाहिजे हे स्वामीजींचं सूत्र आप्पांनी डोळ्यासमोर ठेवलं होतं. अलीकडे शिक्षण आयोगानंही असंच मत नोंदवलेलं आहे. त्यामुळे एकीकडे परंपरेतली मूल्यं, उपासना, प्रार्थना, ध्यान, तर दुसरीकडे यंत्रशिक्षण, इलेक्ट्रॉनिक्स, वाचनवेग, प्रतिभाविकसन अशी नव्या-जुन्याची सांगड प्रबोधिनीत दिसते.

बुद्धिमान मुलांना शिकण्यासाठी आप्पांनी व्यासंगी शिक्षक तयार केले तेही स्वत:च्या उदाहरणातून आपल्यापेक्षा बुद्धिमान मुलं वर्गात आपल्यासमोर असताना त्यांना पुरे पडण्यासाठी आपला कस वाढवावा लागतो. त्यासाठी—

‘ यावज्जन्म अधीते स अध्यापक:|

अशी वृत्ती ठेवावी लागते. अशा वृत्तीचे अभ्यासू शिक्षक प्रबोधिनीत दिसतात.

आप्पांनी घडवलेली शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन साधणारी आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षार्थी न बनता अध्ययनशील राहावं म्हणून अप्रतिम प्रकल्पपद्धती प्रबोधिनीत आहे. क्रीडा आणि वक्तृत्व यांना महत्त्वाचं स्थान आहे. इलेक्ट्रॉनिक्ससारखे आधुनिक विषय आहेत. शिक्षणाला यंत्रोद्योग आणि ग्रामीण सुधारणा यांची जोड दिलेली आहे. मूल्यांचं शिक्षण आहे. अशी ही विद्यार्थ्याला ‘ नोइंग एव्हरीथिंग ऑफ समथिंग अँड समथिंग ऑफ एव्हरीथिंग ‘ करणारी शिक्षण पद्धती आहे.

प्रबोधिनीच्या शाळेत आप्पांनी इंग्रजी आणि हिंदी अशी दोन माध्यमं ठेवली, हेही मला विशेष वाटतं. राष्ट्रभाषेला माध्यमाचं महत्त्वाचं स्थान दिलेलं क्वचितच पाहायला मिळतं त्याचबरोबर विज्ञान-गणितासाठी इंग्रजी माध्यम ठेवण्यात व्यावहारिक शहाणपणही दिसतं. इंग्रजी भाषा शिकवण्यासाठी देवनागरी लिपी वापरण्याचा अभिनव प्रयोग आप्पांनी केला. त्यांच्या या प्रयोगाची पू. विनोबाजींना चांगली माहिती होती आणि ते नेहमी त्याचा उल्लेख करीत असत.

अशा अनेक उपक्रमांतून आप्पांची शिक्षणतज्ज्ञाला साजेशी प्रायोगिकता व्यक्त झाली. त्या उपक्रमात हट्टाग्रहीपणा कधी शिरला नाही. श्रद्धा आणि बुद्धी यांचा जगावेगळा संगम आप्पांमध्ये झालेला होता. त्यातून परिपक्व शहाणपण आलेलं होतं. कोलरिजनं म्हटलं आहे— ’ कॉमनसेन्स् यूज्ड इन् अनकॉमन् मॅनर इझ विज्डम्.’ असं हे शहाणपण होतं.

आप्पा गेल्यानंतर प्रबोधिनीचं काम चालणार आहे, वाढणार आहे याची मला खात्री आहे. या प्रसंगी प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना काही सुचवावंसं वाटतं.

**प्रबोधिनी स्वावलंबीच राहावी**

एक म्हणजे प्रबोधिनीसारख्या स्वावलंबी संस्थांनी स्वावलंबीच राहावं. दुसरं म्हणजे प्रबोधिनीच्या कामाचा विस्तार ( मल्टिप्लिकेशन) होऊ शकेल का? कसा होऊ शकेल? - असं विचारलं जातं.

मला स्वत:ला असं वाटतं की प्रबोधिनीचं काम आदरणीय आहे, पण अनुकरण सुलभ नाही—म्हणजे अनुकरण करायला सोपं नाही. कारण प्रबोधिनीसारखा ‘ इन्टलेक्चुअली अँड आयडियालॉजिकली होमोजिनिअस’ शिक्षकसंच इतरत्र कुठं आहे? ‘ मॅन मेकिंग एज्युकेशन’ मध्ये शिक्षण देणारा आणि घेणारा अशा दोन्ही बाजूंचा ‘ मॅन’ महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रबोधिनी एखाद्या ‘ सीड-फार्म’ सारखे काम करू शकेल. तिथल्या कल्पनांची बीजं इतरत्र वापरता येतील. पण ‘ रेप्लिकॅबिलिटी’ हवी असेल, तर सर्वसाधारण विद्यार्थ्यांची साधारण संस्था चालवून उपक्रमांचं ‘डिफ्यूजन’ करावं लागेल. अशा दृष्टीने निगडीचं ‘नवनगर विद्यालय आणि खेड-शिवापूरचं ‘कृषी तांत्रिक विद्यालय’ हे प्रयोग मार्गदर्शक ठरू शकतील.

आणखी असं वाटतं की प्रबोधिनीची शाळा वसतिगृहयुक्त असायला हवी होती. मी आप्पांना नेहमी म्हणायचो की तुम्ही तुमची मुख्य शाळा शिवापूरला काढायला हवी होती. खेड्यात वसतिगृह आहे म्हणजे विद्यार्थ्यांवर अधिक काळ संस्काराचे प्रयोग करता येतात. मी स्वत: अशा वसतिगृहात वांड विद्यार्थ्यांना ते झोपलेले असताना सूचना देणं, विद्यार्थ्यांना माझ्या घरी मुक्त प्रवेश ठेवणं, असे अनेक प्रयत्न केले होते. वसतिगृहाचा तुरुंग होऊ नये. पण वसतिगृह हे ग्रामीण मुलांसाठी ‘ अ बेटर सब्स्टिट्यूट फॉर होम’ - घरापेक्षा चांगलं घर व्हावं. अशा वसतिगृहयुक्त शाळेत अभ्यास, कला, क्रीडा, ज्ञान,विज्ञान, प्रज्ञान आणि सेवा अशा सात रंगांचं शैक्षणिक इंद्रधनुष्य चांगलं खुलू शकतं.

कैलासवासी आप्पांच्या प्रथम वर्ष-श्राद्धदिनी त्यांच्या स्मृतीला अभिवादन.

वि.वि. चिपळूणकर,
माजी शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

# कै. आप्पा पेंडसे



ज्ञान प्रबोधिनी - सोलापूर

सौ.अवंतिकाबाई केळकर बालविकास - पूर्व प्राथमिक विभाग

बालकाचे नाव : यादव सई दत्तात्रय

| उंची ( सेमी) | वजन ( किलो) | छाती ( सेमी) | हजर दिवस | रजा दिवस | कामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|
| 120.0 | 20.0 | 59.0 | 170 | 8 | 178 |

## शैक्षणिक नोंद

### भाषा व सामान्य ज्ञान

प्रार्थना पाठ असून ताल ठेक्यासह योग्य चालीत म्हणता येते. सर्वांसमोर पुढाकार घेऊन प्रार्थना सांगतो/ सांगते. ताल ठेका लक्षात घेऊन योग्य चालीत वारानुरूप भजने म्हणता येतात. ३/४/५ भजने पाठ आहेत. पाठांतर चांगले असून स्पष्ट उच्चारात व योग्य चालीत श्लोक म्हणता येतात. बडबडगीते/ प्रासंगिक गीते उत्स्फूर्तपणे म्हणत असून गीतास अनुसरून अभिनय करते. अभिनयगीतावर ताल ठेका लक्षात घेऊन नाच करताना चेहऱ्यावरील हावभाव बोलके असतात. गोष्टी लक्षपूर्वक ऐकून स्वत:च्या शब्दांत समूहासमोर सांगता येतात.(शब्दांतल चढ उतार लक्षात घेऊन ) . प्रासंगिक गप्पागोष्टींमध्ये प्रसंगानुरूप संवाद साधता येतो. गप्पागोष्टी पाठात पाठ तंत्रानुसार इतरांचे ऐकून घेण्याचीही तयारी असते. वासाच्या व बिनवासाच्या फुलांची नावे सांगून त्याबद्दल माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. वासाच्या व बिनवासाच्या फुलांचे वर्गीकरण करता येते. कडधान्याची नावे सांगून त्याबद्दल माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. तेलबियांची नावे सांगून त्याबद्दल माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. वाद्यांची नावे सांगून त्याबद्दलची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. वेगवेगळया घरांची नावे सांगून त्याबद्दलची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. वेलीवर येणा-या फळांची नावे सांगून त्याबद्दलची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. वेलीवर येणा-या भाज्यांची नावे सांगून त्याबद्दलची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. विविध धातूंची नावे सांगून त्याबद्दलची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. कंदभाज्यांची नावे सांगून त्याबद्दलची माहिती स्वत:च्या शब्दांत सांगता येते. वचन भेदामुळे नामाच्या रूपात होणारा बदल सांगता येतो, तसेच एकवचनीचे अनेकवचनी रूप आणि अनेकवचनीचे एकवचनी बरोबर सांगता येते. बोलीभाषेत लिंगवाचक शब्दांचा यथायोग्य वापर करता येतो. सुई-दोरा , ताट-वाटी यांसारखे जोडून येणारे शब्द उत्स्फूर्तपणे सांगता येतात. समूहवाचक शब्दखेळात पटापट शब्द सांगता येतात. प्रथम सत्रातील १६ अक्षरांपैकी कोणतीही अक्षरे दिलेल्या शब्दांमधून ओळखता येतात. क ते ज्ञ मुळाक्षरांपैकी कोणतेही अक्षर दिलेल्या शब्दांमधून ओळखता येते. च, झ, ष, श, ह, ज्ञ यासांरखी अक्षरे सुद्धा योग्य क्रमाने उत्तमरित्या हाताळतो. खोदपाटीवरील प्रत्येक अक्षर ओळखून लेखन क्रमाने उत्तम प्रकारे गिरविता येते. चलमुळाक्षर पेटी हाताळून स्वकल्पनेने दोन अक्षरी ,तीन अक्षरी अर्थपूर्ण शब्द बनवून त्याचे वाचन करता येते. प्रथम सत्रांत शिकविलेल्या १६ अक्षरातून तयार होणा-या दोन अक्षरी तीन अक्षरी शब्द ,अक्षरे चटकन वाचता येतात. वनस्पतींचे मुख्य भाग, त्यांचे कार्य, महत्त्व, एक बी ,अनेक बियांची ओळख, सालासकट व साल काढून खाणारी फळे, प्राणी व पक्षी यांचे निवास, खाद्य , आवाज , त्यांच्या

पिल्लांना  काय म्हणतात ? रहदारीच्या नियमांची ओळख, ऋतुमानानुसार घ्यावयाची काळजी, व्यावसायिकांची ओळख, कीटक व सरपटणा-या प्राण्यांची ओळख इत्यादींची ओळख झाली असून त्यांची माहिती आपल्या शब्दांत सांगता येते. भाजी मंडई, बस स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन ,गड्डा यात्रा इत्यादी माहिती ऐकून स्वत:चे अनुभव इतरांना सांगण्यास उत्सुक  असतो/ असते.  नागपंचमी ,स्वातंत्र्यदिन, रक्षाबंधन , गोकुळाष्टमी ,शेती प्रकल्प , गणेशोत्सव , घटस्थापना , दसरा, कोजागरी इत्यादी. सण-समारंभानिमित्त घेतलेल्या नृत्यामध्ये ताल ठेका लक्षात घेऊन नाच करता येतो.

**गणित**

१ते९ अंक चटकन ओळखून तेवढ्याच वस्तू गतीने व मनातल्या मनात मोजून ठेवता येतात. १ते१०अंकराशी मधील कोणत्याही अंकाएवढी राशी बरोबर काढून देता येते तसेच कोणत्याही राशीएवढा अंक सांगता येतो. टोपलीच्या खेळात अंकचिठ्ठीवरील अंक स्मरणात ठेवून अंकाएवढ्याच वस्तू बरोबर मोजून टोपलीत ठेवता येतात. तीन बोटांच्या साहाय्याने रेती अंक लेखन क्रमाने  गिरवता येतात. शून्याची संकल्पना  समजली असून सळीपेटी हाताळून शून्य म्हणजे काहीच नाही हे पटकन  सांगता येते. दिलेल्या वस्तूंचे  दहा-दहाचे गट करून  उरलेल्या वस्तू  मोजून दशक एककच्या स्वरूपात व्यवस्थित सांगता येतात. सांगितलेल्या अंकाएवढे वस्तूंचे अचूक गठ्ठे करता येतात. गठ्ठे करून राहिलेल्या वस्तू मोजून अचूक सांगता येतात. ११ते२०अंकांमधील कोणत्याही वस्तू दिल्या असता वस्तू  मोजून त्याच अंकाची जोडी अचूकपणे लावता येते. अंक अचूक ओळखून तीन बोटांच्या साहाय्याने रेती अंक योग्य क्रमाने गिरवता येतात. १ते९ अंकापर्यंत बेरजेची उदाहरणे मौखिक सोडवता येतात.उदा. चार अधिक तीन सांगितले असता चार मनात ठेवनू त्यापुढे तीन मोजून त्वरीत सात हे उत्तर देतो.. २१ते३०अंकामधील कोणत्याही वस्तू दिल्या असता वस्तू मोजून त्याच अंकाची जोडी अचूकपणे लावता येते. वजाबाकीची संकल्पना चांगली समजली असनू वस्तूंवरून अचूकपणे वजाबाकी करता येते.उदा. दिलेल्या आठ वस्तूमधून तीन वस्तू मित्राला द्या.किती वस्तू उरल्या  ? या प्रमाणे.

**जीवन  व्यवहार**

रूमालाला योग्य तो जोर लावून धूवून झाल्यानंतर स्वच्छ पाण्यात रुमाल घट्ट पिळून  घेतो व झटकून दोरीवर वाळत घालता येतो. छोट्या झाडूच्या साहाय्याने केर मागे राहणार नाही याची काळजी घेता येते .केर टोपलीत न सांडता टाकून हात साबणाने स्वच्छ धुता येतो. दोन्ही पायावर बसनू शरीराचा तोल सांभाळत फरशी पुसताना कापड पाण्यात बुडवून व कापड दोन्ही हातांनी घट्ट पिळून फरशी व्यवस्थित  पुसता येते. साबणाचा योग्य वापर करून  पाण्याने सगळीकडे व्यवस्थित  हात फिरवून ताटली स्वच्छ धुता येते.  एका हातात भांडे धरून दुस̱ऱ्या हाताने पितांबरी पावडर लावून खाली वर सर्व बाजूनी भांडे स्वच्छ करतो. तीन बोटांच्या मदतीने गुंड्या योग्य क्रमाने पटपट लावता व काढता येतात. नेत्रहस्त संयोजन साधून छिद्रातील क्रम लक्षात घेऊन शिवणपाटी व्यवस्थित हाताळता येते व चित्राकृती पूर्ण झाल्यावर लेस काढता येते. दोन्ही हातांचा समन्वय साधून पटकन सफाईदारपणे पडद्याला  नाडी ओवता येते. दोन्ही हातांचा समन्वय साधून तीन बोटांच्या साहाय्याने व्यवस्थित भाजी निवडता येते. दोन्ही हातांचा समन्वय साधून गाजर/ काकडी किसता येते. एका हातात लसणाची पाकळी धरून दुस̱ऱ्या हाताने लसूण सोलता येतो. एका हातात डहाळा धरून दुस̱ऱ्या हाताने डहाळा सोलता येतो. तीन बोटांच्या साहाय्याने व्यवस्थित भुईमुगाच्या शेंगा फोडता येतात. तीन बोटांच्या साहाय्याने लिंबाच्या फोडीला योग्य तो जोर देऊन लिंबू पिळता येते. चाळणीने चुरमुरे चाळताना चुरमुरे खाली न सांडता व्यवस्थित चाळतो .तसेच चुरमु-यातील कचरा वेचून वेगळा काढता येतो. ताईच्या मदतीने भेळ तयार करताना कोथिंबीर निवडणे,शेंगा,बटाटा सोलणे,कांद्याची साल काढणे इ. कामे नेटकेपणाने करतो. कचरा होणार नाही याची काळजी घेतो. ताक घुसळताना खाली सांडणार नाही याची काळजी घेतो. नेत्रहस्त संयोजन साधून विशिष्ट अंतरापर्यंत बाटलीत पाणी भरताना एकाग्रता असते. आंब्याची पाने योग्य पद्धतीने दुमडून व्यवस्थित तोरण तयार करता येते. आभ्र्यामध्ये उशी व्यवस्थित सरकवून उशीला आभ्रा घालता येतो. दोन्ही हातांचा योग्य वापर करून एका हातात सुई-दोरा व एका हातात चुरमुरे धरून व्यवस्थितपणे चुरमु̱ऱ्याचा हार ओवतो. कळशीतून तांब्यात, तांब्यातून फुलपात्रात पाणी ओतताना

अवधानपूर्वक पाणी ओतता येते.

**खेळ**

दोन्ही हात व पाय यांचा समन्वय साधून कोलांटी उडी मारता येते. हात मागे बांधून उंच उडी मारून दोरीला बांधलेले बिस्कीट खाता येते. तोल सांभाळून पोत्यातल्या उड्या पटपट मारून अंतर पार करता येते. लंगडी घालून गटातील मित्रमैत्रिणींना बाद करताना गती जाणवते. तोल सांभाळून मित्रमैत्रिणीशी समायोजन साधून ठराविक अंतरापर्यंत तीन पायांची शर्यत व्यवस्थित खेळता येते. कांदा शर्यत  हा खेळ खेळताना अवधान राखून गतीत खेळ खेळता येतो तसेच मित्रमैत्रिणींना प्रोत्साहन द्यायला आवडते. आंधळी कोशिंबीर खेळ खेळताना आवाजाचा अंदाज घेत खेळ व्यवस्थित खेळता येतो. विशिष्ट अंतरावर ठेवलेल्या अडथळयांवरून  उडी मारताना गती असते. नागमोडी रेषेमधून पाण्याची बादली घेऊन तोल सांभाळत वळणाचा क्रम लक्षात घेऊन पाणी न सांडता चालता येते. पळी योग्य पद्धतीने धरून बटाटे गतीने उचलून ठराविक अंतरावर ठेवलेल्या टोपलीत खाली न पाडता बटाटे ठेवता येतात. एका हाताने चिमटा पकडून एका मिनिटात दोरीला पटपट चिमटे लावता येतात. खंजिरीच्या तालावर संगीत खुर्चीची सुलट-उलट दिशा लक्षात घेऊन खेळ खेळता येतो. ठराविक अंतरावरून नेम धरून चेंडूने लगोरी फोडता येते. अवधान राखून लिंबू चमचा खेळ गतीत पूर्ण करता येतो, खेळताना एकाग्रता असते. मित्रमैत्रिणींशी समायोजन साधत तोल सांभाळत पाठीला पाठ लावून विशिष्ट अंतर व्यवस्थित पार करता येते. चेंडू उंच फेकून मान व हात वर करून चेंडूचा झेल व्यवस्थित घेता येतो. तोल सांभाळत विटांमधील अंतराचा अंदाज घेऊन विटांवरून चालता येते. नेत्रबंधनाचा वापर करून पटकन फुंकर मारून पिठातील गोळी अचूकपणे शोधता येते. नेत्रहस्त संयोजन साधून एकाग्रतेने पटकन सुईत दोरा ओवता येतो. हात मागे बांधून श्वासावर योग्य नियंत्रण ठेवून ताटलीतील चुरमुरे व्यवस्थित  खाता येतात. श्वासावर नियंत्रण  ठेवून नळीच्या साह्याने  वाटाणे उचलता येतात. तबकातील दाखवलेल्या ८ ते १० वस्तूंची नावे स्मरणात ठेवून क्रमाने वस्तूंची नावे पटपट सांगता येतात. डोळे बांधून अंदाज घेत फळयावरील चित्राची पूर्तता करता येते. आसने क्रमाने घालता येतात.

**इंद्रियविकास**

आवाजातील सूक्ष्म फरक लक्षात घेऊन सारख्या  आवाजडबीची जोडी पटकन लावता येते. शांतीच्या पाठात स्नायूंवर नियंत्रण आले असून वस्तू हाताळताना आवाज न करता हाताळता येतात. नेत्रबंधन साहाय्याने गुलाबी मनो-याची रचना करताना स्पर्शाने आकारातील फरक चटकन लक्षात घेऊन व्यवस्थित क्रमशः रचना करता येते. नेत्रबंधनाच्या साहाय्याने स्पर्शपाट्या विशिष्ट पद्धतीने हाताळून सूक्ष्म फरकातील पाट्यांच्या सुद्धा पटापट जोड्या लावता येतात. नेत्रबंधनाने जादची पिशवी हाताळून स्पर्शातील सुक्ष्म फरक लक्षात घेऊन सूक्ष्म वस्तूंच्या जोड्या शोधता येते. नेत्र बंधनाच्या साहाय्याने वजनातील सूक्ष्म फरक लक्षात घेऊन सारख्या वजनाच्या जोड्या पटकन लावता येतात. प्रत्यक्ष अनुभव घेऊन शीत/ उष्ण/समशीतोष्ण स्पर्श पटकन ओळखून त्यांची नावे सांगतो. मूळ रंगावरून तयार होणा-या मिश्र रंगाच्या वस्तूंचे गट करता येतात. रुंदीतील सूक्ष्म फरक लक्षात घेऊन रुंद जीना विशिष्ट पद्धतीने व्यवस्थित  ( पटकन) लावता येतो. आकार, उंची, व्यास यातील फरक ओळखून दट्टापेटीतील दट्टे योग्य खोबणीत तीन बोटांनी धरून बसविता येतात. फरशीचे साधन हाताळताना अचूक रंगसंगती साधून सुयोग्य नक्षी पटकन तयार करता येते. प्रत्यक्ष दिलेल्या चवीचा अनुभव घेऊन सर्व चवी ओळखतो/ओळखते. वासातील सूक्ष्म फरक लक्षात घेऊन सारख्या वासडब्याची जोडी अचूक शोधता येते. वास कोणता आहे हे सांगता येते.

**विज्ञान**

हवा सगळीकडे असते. ज्वलनास हवेची गरज असते. पाऊस कसा पडतो ? लोहचुंबकाचा खेळ, मुळे पाणी शोषतात. फुग्याची केबलकार , ज्योत वर असते. विद्युतघर्षण, नाचणा-या डांबरगोळया, ब्लेड पाण्यावर तंरगते इत्यादी प्रयोग स्वतः करून पाहण्याची उत्सुकता असते.  सजीव व निर्जीव , तरंगणा-या व बुडणा-या वस्तू, विरघळणारे व न विरघळणारे पदार्थ, ठिसूळ व कठीण वस्तू , सच्छिद्र व अच्छिद्र वस्तू , उगवणारे व न उगवणारे पदार्थ, पारदर्शक व अपारदर्शक वस्तू इ.

प्रयोगावरून वस्तूंचे योग्य गटात वर्गीकरण करून त्यासंबंधित प्रश्नांची समर्पक उत्तरे देता येतात. हात ओला न करता नाणे पाण्याबाहेर काढणे. हळद सोडा जादू, विद्युत घर्षण, जादचूा डबा, इत्यादी प्रयोगाधारित प्रश्न विचारतो./विचारते. पाण्याचे गुणधर्म , पाणी शुद्ध करण्याच्या पद्धती इत्यादी प्रयोगांची माहिती सांगताना लक्षपूर्वक ऐकतो / ऐकते.

**मुक्तव्यवसाय / हस्तव्यवसाय / चित्रकला**

मणी व फुले यांची रंगसंगती साधून आकर्षक माळ ओवता येते. मातीच्या गोळयापासून स्वकल्पनेने वेगवेगळया वस्तू बनवताना सुबकता असते. ठोकळयापासून रचना करताना आकर्षक, सुबकतेने, स्वकल्पनेने विविध आकार बनवता येतात. समूहात शंख-शिंपले / बिया/ बांगडीच्या काचा यांपासून वेगवेगळया चित्राकृती तयार करताना कल्पकता असते. दोन्ही बोटांच्या साहाय्याने कागदाचे लहान तुकडे करता येतात. दिलेल्या वस्तूंचा योग्य तो दाब देऊन चित्रात ठराविक अंतरावर ठसे देता येतात. दिलेले चित्र एकाच रंगाने सुबकतेने रंगवता येते. मार्बल पेंटिंग करताना दिलेला कागद तैलरंगात बुडवून चिमट्याला व्यवस्थित अडकवतो. कागद वाळल्यावर तयार होणाऱ्या चित्राविषयी उत्सुकता दाखवतो. पताका चिटकवताना विशिष्ट खुणेपर्यंत गोंद लावून दोरीला व्यवस्थित चिटकवता येतात. घडीकामाच्या पाठात शिकवलेल्या घड्या सुबकपणे घालता येतात. १ ते ९ अंकापासून चित्र काढणे, बोटांच्या ठशाभोवती चित्र काढणे इत्यादीमध्ये कल्पकता असते.

**विशेष नोंदी सवयी / दैनंदिन व सामाजिक आचरण**

नेतृत्वाची आवड असणाऱ्या सईचे सामान्यज्ञान चांगले आहे. पाठांतर चांगले असून स्तोत्र, श्लोक इ. सर्वांसमोर उभे राहून म्हणते. ताल-ठेका लक्षात घेऊन अभिनय गीतावर छान नाच करते.

The greatest sign of
success for a teacher
is, to be able to say,
The children are now working as if,
I did not exist

Maria Montessori

# अध्यापकाच्या नोंद वहीतून ...............

गौरांगी पुरुषोत्तम काटवटे ही मुलगी इ. ९ वी. या वर्गात शिकत आहे. मी गौरांगीला ती लहान होती तेव्हापासून ओळखते. मी प्रथम तिला जेव्हा भेटले तेंव्हा ती इ. ४ थी मध्ये होती. गौरांगी ही अतिशय नम्र स्वभावाची मुलगी आहे. तिची स्मरणशक्ती खूप आहे. अभ्यासामध्ये ती खूपच हुशार आहे.

वर्गात शिकवलेल्या प्रत्येक बारीक गोष्टीकडे तिचे लक्ष असते. जी गोष्ट तिला समजत नाही ती गोष्ट ती परत परत विचारते. तिचे हस्ताक्षर खूपच सुंदर आहे. वर्गात तिची वर्तणूक अगदी सभ्य आहे. ती साहित्याची हाताळणी अतिशय सावधानतेने करते.

इतर मुलींशी तिची वागणूक अतिशय प्रेमळ आहे. तिच्यामध्ये शिक्षकांविषयी खूपच आदरभाव आहे. गौरांगीला इ.८ वी मध्ये गणित विषय समजणे थोडे कठिण जात होते. परंतु ती शिक्षकांना परत-परत विचारत असे. घरी देखील गणिताचा खूपच सराव करत होती, आता तिला इ. ९ वी मध्ये गणित विषय खूप चांगला समजतो आहे. इंग्रजी या विषयामध्येदेखील ती खूप-खूप हुशार आहे.

तिला तिचा परिवार खूप आवडतो. तिला तिच्या घरातील व्यक्तींविषयी अभिमान वाटतो. तिची आई तिला मैत्रिणीप्रमाणे वाटते त्यामुळे ती तिला प्रत्येक गोष्ट मनमोकळेपणाने सांगते. आध्यात्मिक बाबतीत ती खूप हुशार आहे. संस्कृत श्लोक ती काही मिनिटांमध्ये पाठ करते. तिची संपूर्ण भगवद्गीता पाठ आहे. तिची भक्ती भावना देखील खूप चांगली आहे. ती रोज १६ माळा 'हरे रामा हरे कृष्णा....., कृष्णा कृष्णा हरे हरे...... ' जप करते. सकाळी ६ वाजता रोज श्रीकृष्ण मंदिरात जपासाठी येते.

गौरांगी रोज न चुकता देवासाठी राधाराणी हार बनवते. त्यामध्ये तिचे कौशल्य दिसून येते. ती रोज वेगवेगळया डिझाईनमध्ये हार तयार करते .

गौरांगी अतिशय शांत स्वभावाची आहे तशीच ती धाडसीदेखील आहे. तिने कराटे क्लासमध्ये चार-पाच बेल्ट मिळवले आहेत. खेळदेखील ती अतिशय चांगल्या प्रकारे खेळते. तिचा स्वभाव हसरा आणि प्रेमळ असल्याने ती सर्वांची आवडती आहे. तिचे हस्ताक्षर सुंदर असल्यामुळे तिला बऱ्याचदा वेगवेगळया प्रकारचे लेखी काम दिले जाते. ते काम ती अतिशय आनंदाने करते. वर्गातील विविध प्रकल्पांमध्ये ती उत्साहाने भाग घेते.

कोणत्याही कामामध्ये ती स्वत:ला झोकून देते. प्रत्येक काम ती उत्कृष्ट रीतीने करते. वार्षिक स्नेहसंमेलन किंवा जन्माष्टमी असते तेव्हा ती अतिशय उत्कृष्ट नाटिका सादर करत असते. नाटकामधील नृत्यदेखील ती अतिशय सुंदर करते. नृत्यामध्ये, नाटिकेमध्ये ती नेहमी प्रमुख भूमिकेमध्ये असते. गौरांगी ही विद्यार्थिनी म्हणून अतिशय प्रगतीशील आहे. तसेच गौरांगी सर्वांची आवडती विद्यार्थिनी आहे.

प्रा.दिपाली अमोल काळे
गोवर्धन गुरुकूल
पो.हमरापूर , ता. वाडा
जि. पालघर

# अध्यापकाच्या नोंद वहीतून ..............

वैशालीने साखरशाळेत डिसेंबर २००० रोजी प्रवेश घेतला. साखरशाळेतले हे तिचे पहिले वर्ष. ' कारखान्यावर ही कसली साखरशाळा ? आपल्या गावाकडील शाळेपेक्षा ही खूपच वेगळी शाळा आहे' , असे तिला वाटत होते, कारण गावी शाळेत बोलविण्यासाठी ताई किंवा शिक्षक येत नाहीत. वैशाली पहिले दोन महिने शाळेत येत होती, परंतु ती अतिशय अस्वच्छ राहात होती. केस विंचरत नसे. हाताला जखमा होत्या. तिला दररोज घरी जाऊन बोलवावे लागत असे व वारंवार स्वच्छ राहण्याबाबत सूचना द्याव्या लागत होत्या. निवासी शिक्षक दररोज कोपीवर सकाळी फिरून या मुलांना आंघोळ करण्यासाठी सूचना देत. तसेच डेटॉलच्या पाण्याने आठवड्यातून एकदा आंघोळ घालत असत. वैशालीला कोपीवरील सर्वच कामे करावी लागत. कोपी सारविणे,गुरांना चारा टाकणे, पाणी भरणे, भांडी घासणे ही सर्व कामे झाली, तरच शाळेत येण्यास मिळत होते. शिक्षिका दररोज गाडीतळातील कोपीवर फिरून मुलांना गोळा करत. वैशालीला कोपीवरील सर्वच कामे आवरून शाळेत ये, असे रोज सांगावे लागे. तिला साखरशाळेत येऊन चार तास बसणे अवघड होते, कारण घरची कामे आवरली नाही, तर आईचा मार पडत असे. शिवाय तिलाही शाळेची आवड निर्माण झाली नव्हती.

या वैशाली संदर्भातील एक घटना मात्र कायम लक्षात राहिली ती म्हणजे, वैशाली इयत्ता दुसरीत सुनितातांईच्या वर्गात शिकत होती. तिला ताईंनी घरी जाऊन बोलावून आणले होते. तेव्हा ती भांडी घासत होती. ताईंनी तिला दुपारच्या सुट्टीत भांडी घासण्यास सांगितले होते. ती वर्गात भांडी न घासताच आली, ताई तिला थोडे रागवल्या. दुपारच्या सुटीनंतर ती घरी गेली व आईला सांगितले, की सुनिताताईने मला खूप मारले. आठवड्यातून एकदा शिक्षिका पालकांशी संपर्क करीत असतात. त्यांच्या अडचणी शिक्षिका समजावून घेत. असाच एका कोपीवर पालकांशी संवाद चालू होता. बाजूलाच वैशालीची आई होती. ताईंचे बोलणे ऐकून वैशालीची आई शिक्षिकांच्या अंगावर चवताळून आली व म्हणाली की, ' माझ्या मुलीला शिकविण्यासाठी कोणत्या ताई आहेत? त्यांनी माझ्या मुलीला का मारले? ' तिच्या आईने शिक्षिकेला शिव्यांची लाखोली वाहिली. ते शिक्षिकेलाही सहन झाले नाही. त्यांची वादावादी झाली. सर्व शिक्षिका गोळा झाल्या व त्यांना समजावून सांगू लागल्या, ' तुम्ही शिव्या देऊ नका. तुमच्या मुलीच्या शिक्षणासाठीच आम्ही धडपडतोय. ' परंतु आई ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती. वैशालीलाच मुळात शाळेची आवड निर्माण झाली नव्हती. त्यामुळे आई शाळा सोडून घरी राहण्यास सांगेल या आशेने तिने आईला खोटेच सांगितले आणि तसेच घडले. त्यांनी वैशालीला साखरशाळेत पाठविणे बंद केले! ' आमची मुलगी नाही शिकली तरी चालेल' , असे त्यांनी सांगितले.

वैशाली कारखाना हंगाम संपल्यानंतर गावी गेली. जूननंतर गावाकडील शाळा सुरू झाल्या, सर्व मुलांनी साखरशाळेचे प्रमाणपत्र दाखवून पुढील वर्गात शाळा प्रवेश घेतला. परंतु वैशालीकडे प्रमाणपत्र नव्हते. त्यामुळे तिला पुढील वर्गात प्रवेश मिळाला नाही. तिला त्याच वर्गात बसावे लागले. पुढील वर्षी ऑक्टोबरनंतर पालकांचे स्थलांतर सोलापूर जिल्ह्यातील एका कारखान्यावर झाले. कारखान्यापासून वस्ती लांब होती. कारखान्यावर शाळा होती, परंतु ती ऊसतोडणी कामगारांच्या वस्तीपासून लांब होती. त्यामुळे तिला पुढील सहा महिन्यात शाळा व शिक्षण मिळाले नाही. परंतु पालकांनी वैशालीला गावी एप्रिल महिन्यात परीक्षेला बसविले. ती कशीतरी दुसरी इयत्ता पास झाली. गावी जून ते ऑक्टोबर या काळात ती इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकू लागली. ऑक्टोबरनंतर पालकांचे स्थलांतर पुणे जिल्ह्यातील यशवंत सह. साखर कारखाना, थेऊर येथे झाले. यशवंत सह. साखर कारखाना, थेऊर येथे साखरशाळेची पूर्वतयारी करण्याचे काम सुरू झाले. शिक्षिका प्रत्येक उसतोडणी कामगारांच्या कोपीवर जाऊन सर्वेक्षण करीत असताना वैशालीची आई भेटली व म्हणाली, ' ओळखलं का मला? ' तेव्हा शिक्षिका म्हणाल्या, ' तुमची ओळख आम्ही विसरूच शकत नाही. '

'  माझ्या मुलीचा प्रवेश अर्ज भरून घ्या. मला माझ्या मुलीला तुमच्या साखरशाळेत पाठवायचे आहे. '  शिक्षिकेने अर्ज भरून घेतला. वैशालीच्या आईने सर्व शिक्षिकांना चहाही पाजला.

वैशाली त्यानंतर दररोज शाळेत येऊ लागली. शाळा परिसर स्वच्छ करणे, वर्गाची सजावट, वर्ग स्वच्छता इ. कामात ती भाग घेऊ लागली. अभ्यासात थोडी कच्ची होती. परंतु तिला रात्रीच्या अभ्यासिकेला बोलावून, वाचन, लेखन, संख्याज्ञान, संख्याक्रिया इ. घटकांवर भर देऊन तिच्यात खूपच बदल झाला. वर्गात ती एका गटाची प्रमुख झाली, तसेच वर्गात मागे राहणाऱ्या मुलींना मदत करू लागली.

तोंडी हिशोब, हातच्यांची बेरीज, वजाबाकी करू लागली. अर्थपूर्ण वाचू लागली. ताईंना शाळेत मुलांना गोळा करण्यास मदतही करत असे. सुरूवातीला ती थोडी अस्वच्छ येत होती, परंतु आता तिला स्वच्छतेचे महत्त्व पटू लागले. तसेच साखरशाळेच्या परिपाठाला बोधकथा सांगितल्या जात, याचाही चांगला परिणाम झाला. ज्ञानप्रबोधिनीच्या आठवीच्या वर्गातील प्रबोधिकाताई कशा स्वच्छ येत, त्यांचे कपडे चांगले स्वच्छ असत, तसेच आपले असावेत असे तिला वाटले आणि वैशाली दररोज शाळेत चांगले कपडे घालून, वेणी घालून येऊ लागली. शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात यावर्षी तिने अतिशय चांगल्या प्रकारचा सहभाग घेतला. प्रत्येक कार्यक्रमात त्या मुलीला भाग घेण्याची इच्छा असे. जी वैशाली गेली दोन वर्षे साखरशाळेत येण्यास भीत असे, तीच वैशाली साखरशाळेतील सर्व कार्यक्रमांत उत्तमरित्या सहभागी झाली.

तिचे वडील म्हणतात, ' गावातच आता १० वीपर्यंत शिक्षणाची सोय झाली आहे. आमच्या समाजात मुलींना शिकवत नाहीत. परंतु मी तिला शिकवणार आहे. ' तिच्या आईने व वडिलांनी शाळेत येऊन सांगितले की आमच्या मुलांच्या बोलण्यात व वागण्यात खूपच बदल झाला आहे.

योग्य मार्गदर्शनामुळे तसेच थोडे अनुभव घेतल्याने एखादी व्यक्ती किती बदलू शकेल याचे हे मूर्तिमंत उदाहरण होते. असे बदल झाले तरच चित्र थोडे बदलेल.


प्रकाश रणनवरे<br>
प्रकल्प समन्वयक<br>
१०० दिवसांची साखरशाळा<br>
ज्ञान प्रबोधिनी , पुणे


> An observant child should be put in the way of things worth observing.
>
> Charlotte Mason

## To Whom It May Concern

I know Miss Palvi Raikar since past 14 years as Principal of her secondary school 'Jnana Prabodhini Prashala', a school for academically gifted children and her mentor in all her educational programs.

Palvi joined my school in the academic year 1996-97 in grade 5 at the age of 10 years and I am following her as her mentor till today. Her scores on intelligence tests, conducted for admission to the school placed her in top 1%. She excelled in curricular and co-curricular activities conducted during her school days. She is National Talent Scholarship holder. She did excellent project work in all the years which included laboratory investigations. I remember two excellent projects done by her as budding Science Investigator. One was related to making a natural eco-friendly biodegradable detergent which fetched her Diamond Jubilee Award from National Chemical Laboratory, a premier Research Institute in India. The other one was about electron transfer during photosynthesis to explore possibility of generating electric current from natural processes. This project was well appreciated at National Children ' s Science Congress and Intel Discovery Fair.

Palvi is a true learner and is one of the top 1 % students whom I taught in my teaching career of 25 years in the school for intellectually gifted children. Her grasp of any new subject is excellent. Right from young age she showed signs of very good ability of analytical and critical thinking. Apart from high intelligence she possesses many qualities including perseverance which help her in attaining a task. Whenever she came across any difficult problem she used to think differently and came up with out of box solution.

She actively participated in social projects of Jnana Prabodhini and tried to understand social scenario in rural area. She was a member of Jnana Prabodhini teams which went to different parts of my country to study and understand problems of poverty and development. Palvi has pleasant personality and can be a member of any team. Because of her helping nature she is an asset to any group. She is apatient listener and can understand different view points. She possesses good communication skills which I observed during our campaign of for promotion of magazine for children 'Chhatra Prabodhan' I recommend her strongly for any academic research program.

Yours sincerely

(Vivek Ponkshe )


Ex Principal



### Chess as a career

Discussion with Abhijit Kunte

More Details



### संस्कृत सुभाषित आणि अर्थ

वन्दे सरस्वतीं देवीं .....

More Details



### Dance as a career

Discussion with Rujuta Soman

More Details




### Natural Resources

For Class 7

More Details







### हडप्पा संस्कृती

इयत्ता ६ वी आणि ७ वी साठी

More Details

### जैन धर्म

इयत्ता ६ वी आणि ७ वी
मराठी माध्यमासाठी

More Details


## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४

ई – मेल : erc@jnanaprabodhini.org